




दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७२ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । २५/०३/२०२६ । पाने - ६







# पंचायत समिती अधिकाऱ्याला मारहाण

## शरद थोरातांना अटक, दहा जणांवर गुन्हा दाखल, महिलेची फर्याद घेण्यास टाळाटाळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील शेडगाव येथील बचत गटातील समुदाय संसाधन व्यक्ती (सी.आर.पी.)काम करणाऱ्या महिलेलेचे मानधन देण्यास वारंवार टाळाटाळ करीत असल्याबद्दल जाब विचारण्याचा राग आल्याने पंचायत समितीच्या तालुका अभियन व्यवस्थापकाने उद्धट उत्तरे दिले. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते शरद नाना थोरात व या अधिकाऱ्यामध्ये सुरवातीला बाचाबाची झाली. त्यातून मोठा राडा झाल्याची घटना सोमवार दि. २३ मार्च रोजी दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान घडली. या घटनेत शरद नाना थोरात यांच्या कार्यकर्त्यांनी या अधिकाऱ्याला त्यांच्याच कॅबीनमध्ये मारहाण केली. या प्रकरणी नंदलाल पोपटराव कोकाटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शरद नाना थोरात, अभिषेक थोरात, ऋषीकेश थोरात, अक्षय भालेराव, शिवामत भोकरे (सर्व रा. संगमनेर) इतर चार ते पाच अनोळखी आशा नऊ ते दहा जणांवर शासकीय कामात अडथळ्यासह अनेक कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद थोरात, अक्षय भालेराव यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नंदलाल कोकाटे हे गेली दोन वर्षांपासून संगमनेर पंचायत समितीमध्ये तालुका अभियन व्यवस्थापक म्हणुन काम करत आहे. संगमनेर तालुक्यातील महिला बचतगटांवर नियंत्रण ठेवणे, त्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देणे असे काम नंदलाल कोकाटे हे करत होते. दरम्यान तालुक्यातील शेडगाव येथील महिला बचतगटातील समुदाय संसाधन व्यक्ती (सी. आर. पी.) या महिलेची गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार होती. या महिलेला गटविकास अधिकाऱ्यांनी नोटीस बजावली. या नोटिसाला उत्तर न दिल्याने सदर महिलेचे सी.आर.पी.चे मानधन थांबवले. (पान ४ वर)

### महिलांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

**तालुक्यातील एका सीआरपी म्हणून कार्यरत असलेल्या महिलेचे मानधन जाणीवपूर्वक रोखून धरले. वेळोवेळी मानसिक त्रास देऊन लज्जा उत्पन्न होईल असे गैर वर्तन केल्याचा गंभीर आरोप सदर महिलेने केला आहे. संबंधित महिलेने वारंवार आपले थकीत मानधन मिळावे यासाठी मागणी केली होती. मात्र संबंधित अधिकारी नंदलाल कोकाटे यांनी तिच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर, त्यांनी त्या महिलेशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. याबाबतची कैफीयत त्यांनी सामाजिक कार्यकर्ते शरद नाना थोरात यांच्याकडे मांडली. त्यानंतर थोरात यांनी पंचायत समितीत जाऊन कोकाटे यांच्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोडगा काढण्याऐवजी कोकाटे यांनी थोरात यांच्याशी उद्धट वर्तन करत शिवीगाळ केली. हा प्रकार रस्त्यावरच घडल्याने संबंधित अधिकाऱ्याने रस्त्यावरचा दगड उचलून त्यांच्या दिशेने उगारला.**

**या घटनेनंतर संतप्त झालेल्या थोरात यांच्या कार्यकर्त्यांनी कोकाटे यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला असता सदर घटना घडली आहे. सदर महिलेने शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असता पोलीसांनी त्यांची फिर्याद घेण्यास नकार दिला. त्यामुळे संतप्त झालेल्या तालुक्यातील शेकडो महिलांनी पोलीस ठाण्यात ठिय्या दिला.**

# संघटित गुन्हेगारीवर आश्वीत कारवाई

## कलम १११ लागू, आरोपींना कडक शिक्षेची शक्यता

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आश्वी पोलीस स्टेशन गु.र.नं. १४१/२०२४ मधील गंभीर मारहाण व जबरी चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी मोठी आणि महत्त्वपूर्ण कारवाई करत भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १११ (संघटित गुन्हेगारी) हे वाढीव कलम लागू केले आहे. या निर्णयामुळे संबंधित आरोपींवर अधिक कडक कायदेशीर कारवाई होणार असून त्यांना दीर्घ काळ जामीन मिळण्याची शक्यता कमी झाली आहे. कशी माहिती अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.



दि. ११ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास आश्वी बु. येथील दाढ रोडवरील पेट्रोल पंपासमोर ही घटना घडली होती. फिर्यादी व त्यांचा मित्र हे शशिकांत नागरे यांच्याकडून घेतलेले पैसे परत करण्यासाठी आले असता, आरोपींनी त्यांना अडवून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लाथाबुक्यांनी, काठी व लोखंडी गजाने मारहाण करून दोघांना जखमी केले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी फिर्यादीच्या खिशातील सुमारे २५ ते ३० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले तसेच चाकूने जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी आरोपी रविंद्र ऊर्फ बंटी आबासाहेब मदने (रा. आश्वी बु.), वसीम रशिद शेख (रा. आश्वी बु.), तुषार विलास सोनवणे (रा. आश्वी खु.) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११९(२), ११८(१), ३५२, ३५१(२), ११५(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, तपासात आरोपी हे आर्थिक फायद्यासाठी संघटित टोळी तयार करून गुन्हेगारी कृत्ये करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या गुन्ह्यात कलम १११ लागू करण्याचा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर यांनी अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्याकडे पाठविला होता. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी प्रस्तावाचा सखोल अभ्यास करून आरोपींची संघटित गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये लक्षात घेत कलम १११ लागू करण्यास मंजुरी दिली.

नवीन कायद्यानुसार कलम १११ हे संघटित गुन्हेगारीसाठी विशेषतः लागू करण्यात आले असून, मोक्का कायद्याप्रमाणेच यामध्ये जन्मठेपेपर्यंत शिक्षा होऊ शकते. तसेच, आरोपींनी यापूर्वी दोन किंवा (पान २ वर)

# भोंदूगिरीच्या आड दडलेले विकृती आणि समाजाची जबाबदारी

## ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।

### विशेष संपादकीय...

**ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।१।।**
**अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ।।२।।**
**दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।३।।**
**तुका म्हणे सांगों किती । जळो तयांसी संगती ।।४।।**

**- संत तुकारामंत तुकाराम**

महाराजांचा हा अभंग आजच्या समाजस्थितीवर अत्यंत नेमकेपणाने भाष्य करतो. बाहेरून साधूपणाचा आव आणणारे, अंगावर राख लावणारे, वैराग्याचा दिखावा करणारे पण आतून पाप, स्वार्थ आणि विकृत कृत्यांनी भरलेले लोक यांची खरी ओळख तुकोबांनी शेकडो वर्षांपूर्वीच करून दिली होती.

आजच्या काळात ही भोंदूगिरी अधिक धोकादायक रूप धारण करताना दिसते. देव, धर्म आणि अध्यात्म या पवित्र संकल्पनांचा आधार घेऊन काही व्यक्ती समाजात आपले वर्चस्व निर्माण करतात. गुरु, महाराज, बाबा अशा नावांनी ते सामान्य लोकांचा विश्वास संपादन करतात. लोकांच्या श्रद्धा, अडचणी, भीती आणि आशा यांचा गैरफायदा घेत ते स्वतःचा स्वार्थ साधतात.



विशेषतः महिलांचे शोषण ही या भोंदूगिरीची सर्वात वेदनादायक बाजू आहे. अध्यात्माच्या नावाखाली, मुलं होण्यासाठी, संसार सुखी होण्यासाठी, किंवा संकट दूर करण्यासाठी विविध प्रलोभने दाखवली जातात. या प्रलोभनांच्या जाळ्यात अडकलेल्या अनेक महिलांवर अन्याय होतो, त्यांचे मानसिक आणि शारीरिक शोषण केले जाते. समाजातील दुर्बल घटक-गरीब, अशिक्षित आणि अडचणीत सापडलेले लोक हे या भोंदूगिरीचे सर्वात मोठे बळी ठरतात.

याहूनही गंभीर बाब म्हणजे अशा व्यक्तींना अनेकदा सत्ताधारी, राजकारणी किंवा आर्थिकदृष्ट्या बलाढ्य लोकांचे संरक्षण मिळते. त्यांच्या अवैध व्यवसायांना आणि विकृत कृत्यांना झाकण्यासाठी राजकीय पाठबळ दिले जाते. काही वेळा या तथाकथित धार्मिक व्यक्तींच्या माध्यमातून स्वतःच्या स्वार्थासाठी समाजावर प्रभाव टाकण्याचे कामही केले जाते. त्यामुळे अशा भोंदूगिरीला आळा बसण्याऐवजी ती अधिक वाढीस लागते.

शैक्षणिक संस्था, वसतिगृहे किंवा आश्रम यांसारख्या ठिकाणीही अशा प्रकारचे प्रकार घडत असल्याच्या घटना समोर येतात. सेवा, संस्कार किंवा धार्मिक शिक्षण यांच्या नावाखाली मुली आणि महिलांवर अन्याय होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. अशा घटनांमुळे समाजातील नैतिक मूल्यांना मोठा धक्का बसतो.

**तुकाराम महाराज म्हणतात-**
**अंगा लावूनियां राख ।**
**डोळे झांकुनी करिती पाप ।।**

याचा अर्थ, बाह्य रूपावर विश्वास ठेवू नका; कारण अनेकजण (पान ४ वर)

# दिल्ली नाका, जुना बैलबाजार येथील अतिक्रमणाचा मुद्दा विधानसभेत

## मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहासाठी जागा देण्याची आ. खताळांची मागणी




**संगमनेर शहरातील दिल्ली नाका व जुना बैल बाजार या ठिकाणच्या अतिक्रमणावर निश्चित कारवाई केली जाईल, असे आश्वासन देत समाज कल्याण केंद्राच्या आरक्षणासाठी ना हरकत दाखला मिळवण्यासाठीचा प्रस्ताव आता थेट टाऊन प्लॅनिंग विभागाकडे सादर करत असल्याचे नगर विकास व सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषद हद्दीतील दिल्ली नाका परिसरातील जुना बैल बाजार व नाटकीनाला येथील शासकीय जागेवरील अतिक्रमणाचा प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करत राज्य सरकारचे लक्ष वेधले. सदर जागेवरील अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह उभारण्यात यावे, यासाठी ती जागा देण्यात यावी अशी मागणी आमदार खताळ यांनी विधीमंडळात केली. संगमनेर शहरातील दिल्ली नाका, जुना बैल बाजार येथील सर्वे नंबर ८१६ (सिटी सर्वे नंबर १६४९, नवीन २०९) मधील सुमारे १.२६ हेक्टर क्षेत्र नगरपरिषद मालकीचे असल्याचे नगर विकास व सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आपल्या उत्तरात स्पष्ट केले.

या परिसरात नाटकीनाला व प्रवरा नदीलगत असल्यामुळे १९७५ च्या पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे त्या वेळी येथील नागरिकांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले होते. मात्र त्यानंतर नगरपरिषद प्रशासनाने संबंधित जागेचा ताबा घेणे अपेक्षित असतानाही तसे झाले नाही. यामुळे आज या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून गॅरेज, भंगार दुकाने व इतर अवैध व्यवसाय सुरू आहेत. ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असल्याचे आमदार खताळ यांनी विधिमंडळाच्या निदर्शनास आणून दिले.

सदर जागा नगरपरिषदेच्या मालकीची असल्याचे शासनाने मान्य करूनही अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे अतिक्रमण तातडीने हटवून जागा नगरपरिषद ताब्यात घ्यावी, तसेच यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी ठाम मागणी आमदार खताळ यांनी केली. तसेच ही जागा अतिक्रमणमुक्त करून त्या ठिकाणी मागासवर्गीय मुलांसाठी वसतिगृह उभारावे किंवा प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजना राबवून गरजूंना पुनर्वसनाचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशीही त्यांनी मागणी केली.









# ज्येष्ठ कार्यकर्ते माधव रामभाऊ हासे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर -संगमनेर तालुक्यातील राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे खंदे पुरस्कर्ते राजापूर येथील माधव रामभाऊ हासे यांचे मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सकाळी आकस्मित निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात आई छबूबाई, भाऊ विनायक, अरुण, सुदर्शन ही मुले, दोन मुली असा परिवार आहे.



माधव रामभाऊ हासे राजापूर गावातील आघाडीचे नेतृत्व म्हणून कार्यरत असताना संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य होते. तसेच संजय गांधी निराधार योजना समितीचे माजी अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केलेले आहे. विशेषतः सामान्य जनतेसाठी, गरिबांसाठी कोणत्याही क्षणी सहाय्य करणारे म्हणून त्यांची फार मोठी प्रसिद्धी होती. पंचक्रोशीमध्ये माधवशेठ म्हणून त्यांना ओळखले जायचे आणि मान पण दिला जायचा. त्यांच्या आकस्मित निधनाने राजापूर ग्रामस्थांना दुःख झाले आहे. संगमनेर तालुक्याचे नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना अतिव दुःख झाले आहे. त्याचबरोबर नाशिक विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे तसेच सहकारातील सर्व नेते, कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी यांना माधवराव हासे यांच्या निधनाचे दुःख झाले आहे. त्यांचा अंत्यविधी बुधवार दिनांक २५ मार्च २०२६ रोजी सकाळी राजापूर येथे अमरधाम मध्ये होईल असे त्यांच्या कुटुंबीयांनी कळविले आहे.

# इराण - अमेरिका तणाव तीव्र; शस्त्रसंधीवरून नव्या धमक्या



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणविरुद्ध पाच दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केली होती. इराण आणि आमच्यात सध्या सकारात्मक चर्चा सुरु आहे. त्यामुळे इराणमधील वीज प्रकल्पांवर पुढील पाच दिवस हल्ले करणार नाही, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली होती. ट्रम्प यांची ही घोषणा एकतर्फी असल्याची चर्चा रंगली होती. मात्र आपल्याच घोषणेला काही तास उलटत नाही तोच आता डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला नवी धमकी दिली आहे. चर्चा निष्फळ झाली तर बॉम्बफेक करू असं त्यांनी म्हटले आहे.

इराणमध्ये सत्तांतर होईल, व्हेनेझुएलाप्रमाणे इराणमध्येही एक नेता शोधला जाईल असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले. मात्र, यावेळी ट्रम्प यांनी १५ कलमी कराराचा उल्लेख टाळला. इराणने अणुशस्त्र न बाळगण्यास सहमती दर्शवल्याचा दावा ट्रम्प यांनी केला. मात्र, ट्रम्प नेमक्या कोणत्या इराणी नेत्याशी बोलत आहेत ते नाव मात्र त्यांनी उघड केलेले नाही. आम्ही अशा व्यक्तीशी बोलत आहोत, ज्याला मी सर्वात आदरणीय आणि खरा नेता मानतो. ते सर्वोच्च नेते नाहीत. त्यांच्याबद्दल कोणीही काहीही ऐकलेले नाही असं ट्रम्प यांनी म्हंटले. मोजतबा खोमेमी यांच्याबद्दल ते म्हणाले की, ते जिवंत आहेत की नाही हेदेखील आम्हाला माहीत नाही, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प इराणसोबत चर्चा झाल्याचा सतत दावा करत आहेत आणि त्यासंदर्भात निवेदने जारी करत आहेत. ट्रम्प यांचा दावा आहे की इराणसोबत चांगली चर्चा झाली असून, करार होण्याची आशा आहे. ट्रम्प यांनी असाही दावा केला की, इराणने आपला अणुकार्यक्रम सोडून देण्यास सहमती दर्शवली आहे. त्यामुळे अमेरिकन लष्कराला ट्रम्प यांनी इराणमधील वीज प्रकल्पांवरील हल्ले टाळण्यास सांगितल्याचे सांगितले जाते.

दरम्यान ट्रम्प यांना अटी घालण्याचा कोणताही अधिकार नाही असं इराणने स्पष्ट केले आहे. इतर देशांच्या माध्यमातून अमेरिकेशी चर्चा सुरू आहे. मात्र, अमेरिकेने आमच्या दोन अटी मानण्यास नकार दिलाय असं इराणने म्हटले अमेरिकेने आम्हाला नुकसान भरपाई द्यावी अशी इराणची पहिली मागणी आहे, तसंच अमेरिकेनेच प्रथम आक्रमण केल्याचं कबूल करावं, ही दुसरी मागणी इराणने केली होती. अमेरिकेने या दोन्ही अटी मानण्यास नकार दिल्याचं इराणचं म्हणणं आहे.

# संगमनेरात श्रीरामनवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती - दुर्गावाहिनी, संगमनेर प्रखंड यांच्या वतीने श्रीरामनवमी निमित्त पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात भव्य-दिव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५:००वाजता श्रीराम मंदिर, अभिनव नगर, नवीन नगर, संगमनेर येथून या शोभायात्रेचा प्रारंभ होणार आहे.

या शोभायात्रेत विविध आकर्षक आणि धार्मिक देखावे सादर करण्यात येणार असून सनई-चौघडा, भजनी मंडळ, गोमाता दर्शन, उज्जैन शैलीतील डमरू वादन, महादेव व दत्त मूर्ती, नवनाथांचा जीवंत देखावा, महाबली हनुमान लाईव्ह शो, मोटमल बॅण्ड, खाटू श्यामजी मूर्ती, कालिका माता अवतार लाईव्ह शो, लोडली डी.जे., श्री राम दरबार, भारत माता, पेपर ब्लास्ट, भव्य रंगोली, रथ तसेच तिरुपती बालाजी लाईव्ह शो आदी. प्रमुख आकर्षणे असणार आहेत.

या भव्य धार्मिक सोहळ्यात माता-भगिनींनी तसेच हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विहिंपचे



जिल्हामंत्री विशाल वाकचौरे, सहमंत्री गोपाल राठी, आमदार अमोल खताळ, उद्योजक गिरीश मालपाणी तसेच बजरंग दल, मातृशक्ती - दुर्गावाहिनी संगमनेर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संगमनेरकर गॅस-पेट्रोलच्या रांगेत; जागतिक घडामोडींचे स्थानिक परिणाम

**गॅस भरण्यासाठी लागलेल्या रांगा**



**पेट्रोल भरण्यासाठी झालेली गर्दी**



### अफवा ठरतेय टंचाईला कारण

**एखाद्या पेट्रोल पंपावर पेट्रोल संपले असेल किंवा गाडी येत असेल तर पेट्रोल संपले, पेट्रोल संपले अशा अफवा उठता आणि त्यातूनच पंपावर गर्दी होत आहे. कालही अशीच एक अफवा पठार भागात उठली आणि संपूर्ण तालुक्यात पंपावर रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले असे म्हटले जाते. पंपावर येणारा प्रत्येक ग्राहक हजार, पाचशे रुपयांचे किंवा टाकी फुल करीत असल्याने अनेक पंपाचे पेट्रोल अवघ्या काही वेळातच संपले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर :- जागतिक पातळीवरील तणावपूर्ण परिस्थितीचे पडसाद आता थेट सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर उमटताना दिसत असून संगमनेर शहरासह संपूर्ण तालुक्यात गॅस व इंधनासाठी नागरिकांची अक्षरशः धावपळ सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून गॅस एजन्सीबाहेर लागणाऱ्या लांबलचक रांगांनंतर आता पेट्रोल पंपांवरही प्रचंड गर्दी उसळल्याचे चित्र सोमवारी (ता. २३) पाहायला मिळाले.

शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर दुचाकी, चारचाकी आणि व्यावसायिक वाहनांची मोठी रांग लागली होती. इंधन दरवाढीच्या शक्यतेमुळे वाहनचालकांनी घाईघाईने पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी गर्दी केल्याने काही ठिकाणी तुटवड्याची स्थिती निर्माण झाली. परिणामी, काही पंपचालकांना पेट्रोल संपले असे फलक लावण्याची वेळ आली.

ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून लांबच लांब रांगा सर्वत्र दिसून येत आहेत. भविष्यात इंधन सहज उपलब्ध होईल की नाही, या अनिश्चिततेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे अनेक जण गरजेपेक्षा जास्त इंधन साठवण्याकडे वळत आहेत.

दरम्यान, गॅस सिलिंडर मिळवण्यासाठीही नागरिकांची धावपळ कायम आहे. सकाळपासूनच एजन्सीबाहेर रांगा लागतात आणि दिवसभर तीच परिस्थिती कायम राहते. पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने गॅस उपलब्धतेवरही परिणाम झाल्याचे नागरिक सांगत आहेत.

दरवाढीच्या भीतीमुळे ग्राहकांच्या वर्तनातही बदल दिसून येत आहे. पूर्वी शंभर रुपयांचे पेट्रोल घेणारे ग्राहक आता थेट पाचशे रुपयांचे इंधन भरत आहेत. सलग सुट्ट्या आणि पुरवठ्यातील अडथळे यामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. काही ठिकाणी कंपनीकडे आरटीजीएस केल्यानंतरच इंधन मिळत असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पंपचालकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये आणि संयम बाळगावा.

# पिकअप उलटल्याने १८ शेतमजूर जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील मुथाळणे घाटात रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात पिकअप वाहन पलटी होऊन १८ शेतमजूर जखमी झाले आहे. त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

उदापूर, मांडणे परिसरात काम आटोपून शेतमजूर पिकअपमधून घरी परतत होते. सायंकाळी सुमारास मुथाळणे घाटातील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप रस्त्यावर पलटी झाली. अपघात होताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले. या अपघातात १८ जण किरकोळ जखमी झाले असून एक जण गंभीर जखमी आहे. सर्व जखमींना तातडीने ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल प्र करण्यात आले, तर गंभीर जखमीला पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. दरम्यान, या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने वाहनचालकांनी खबरदारी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# आपत्कालीन आरोग्य सेवा मजबूत करण्यासाठी सरकार १७३७ नवीन रुग्णवाहिका सुरू करणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सरकार १७३७ नवीन रुग्णवाहिका सुरु करणार आहे. महाराष्ट्रातील आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी राज्य सरकार एक मोठे पाऊल उचलत आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत माहिती दिली की, राज्यात लवकरच १७३७ नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जातील. आरोग्य योजनांमधील अनियमिततेविरोधातही



सरकारने कठोर भूमिका घेतली आहे.

आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचार देणे खासगी रुग्णालयांसाठी बंधनकारक आहे. जर कोणत्याही खासगी रुग्णालयाने या योजनांअंतर्गत रुग्णांवर उपचार करण्यास नकार दिला, तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.मंत्र्यांनी सांगितले की, १०८ रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये आपत्कालीन आरोग्य सेवा आधीपासूनच पुरवल्या जात आहे.

वाढती लोकसंख्या आणि रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन, या सेवेत आणखी सुधारणा केली जात आहे.यासाठी, रुग्णवाहिका सेवेतील त्रुटींचा आढावा घेण्यासाठी आणि त्या दूर करण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. मंत्र्यांनी स्पष्ट केले की, रुग्णवाहिका सेवा खाजगी एजन्सींमार्फत चालवल्या जातात आणि या एजन्सींना कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे बंधनकारक आहे. कोणतीही एजन्सी नियमांचे उल्लंघन करताना किंवा अनियमितता करताना आढळल्यास, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदे लवकरच भरली जातील, असे आश्वासनही दिले.

# अकोलेतील बेकायदा दारुची दुकाने हटवा

### अन्यथा उपोषणाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोल - शहरातील कोल्हार-घोटी रस्त्यालगत व परिसरात असणारी भरवस्तीतील अवैध दारूची दुकाने हटविण्यात यावी. अन्यथा १ एप्रिल २०२६ पासून दारूबंदी आंदोलनाचे सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली अकोले पोलीस ठाण्यासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा शहर व तालुक्यातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह सजग नागरिकांनी दिला आहे.

याबाबत पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की शहरात भरवस्तीत असणाऱ्या खटपट नाक्यावरील कोल्हार घोटी राज्य मार्गालगत डॉ. विराज शिंदे यांच्या हॉस्पिटल शेजारील देशी दारूचे दुकान व शिवाजी चौक रस्त्यालगत विजय फूट वेअर समोरील वाईन शॉप यामुळे नागरिकांना विशेषतः येणाऱ्या

जाणाऱ्या महिला, तरुणी यांना दारू पिणाऱ्या लोकांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात सातत्याने दारू पिणारे लोक भांडणे व शिवीगाळ करीत असतात. तसेच रहदारीस, वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण करतात. शाळेत जाणाऱ्या लहान मुला-मुलींना देखील मोठा त्रास सहन करावा लागत असतो.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी अलिकडेच घेतलेल्या आमसभेमध्ये ही दुकाने हलविण्याच्या संदर्भात गंभीर चर्चा होऊन देखील अद्याप यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही. संबंधित दुकाने शहराबाहेर १५ दिवसांच्या आत हलवावी.

अन्यथा पोलीस ठाण्यासमोर सर्वपक्षीय कार्यकर्ते, नागरिक, दारूबंदी आंदोलनाचे सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली १ एप्रिलपासून महिलांसह

मोठ्या संख्येने बेमुदत उपोषणास बसणार असल्याचा इशारा ज्येष्ठ नेते जे. डी. आंबरे, डॉ. नीलेश सहाणे, डॉ. विराज शिंदे, डॉ. साहेबराव वैद्य, डॉ. कमलाकर सातपुते, डॉ. नितीन चासकर, डॉ. दर्शन बंगाळ, डॉ. संदेश भांगरे, डॉ. आसिफ तांबोळी, सोमेश्वर धुमाळ, सुनील डांगरा, अमोल वाडगे, पराग वाडगे, अनिल डेरे, भागवत नवले, सतीश वाकचौरे, दिनेश बुब, प्रा. अरुण पवार, नामदेव भालेराव, श्यामसुंदर मुंदडा, रवींद्र चोथवे, सतीश चोथवे, दीप लहामगे आदिंनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, आमदार डॉ. किरण लहामटे, जिल्हा अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, उपविभागीय अधिकारी संगमनेर, तह-सीलदार, मुख्याधिकारी आदिंना पाठविण्यात आल्या आहे.

# आरोग्य सुरक्षेसाठी केंद्राची कडक पावले

# अनधिकृत औषधांवर धडक मोहीम

मुंबई (वृत्तसंस्था)

देशातील औषधांचा दर्जा सुधारण्यासाठी एका मोठ्या कारवाई अंतर्गत, ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया (डीसीजीआय) ने अनधिकृत फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन (एफडीसी) औषधांविरुद्ध देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. नियामक संस्थेने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील औषध नियंत्रकांना ९० एफडीसी औषधांची चौकशी करून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे.सूत्रांनुसार, सुगम लॅबच्या २०२५ च्या चाचणी डेटामध्ये मोठ्या संख्येने औषधांचे नमुने अनधिकृत आढळले आहे, ज्यांचे वर्गीकरण नवीन औषधे म्हणून केले आहे. नियमांनुसार, केंद्रीय परवाना प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय कोणतेही नवीन औषध तयार किंवा विकले जाऊ




शकत नाही. छाननीत असलेल्या औषधांमध्ये मल्टीव्हिटॅमिन्स, फॉलिक सिड सिरप, पॅरासिटामॉल, क्लोट्रिमाझोल आणि बेटामेथासोन क्रीम, डायक्लोफेनाक पोटॅशियम आणि डायसायक्लोमाइन हायड्रोक्लोराइड टॅब्लेट्स यांचा समावेश आहे.राज्यांना पाठवलेल्या एका पत्रात, डीसीजीआयने म्हटले आहे की पुरवठा साखळीत अप्रमाणित औषधांच्या उपस्थितीमुळे सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होतो. हे औषध आणि सौंदर्यप्रसाधने कायदा, १९४० आणि त्याच्याशी संबंधित नियमांचे उल्लंघन असल्याचेही दर्शवते. डीसीजीआयने राज्यांना संबंधित उत्पादक, विक्रेते आणि इतर हितधारकांविरुद्ध चौकशी सुरू करून योग्य नियामक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच, अशा औषधांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर कडक देखरेख ठेवण्याचे निर्देशही दिले आहे.

# महाराष्ट्रात भोंदूगिरीचा विळखा; तेरा वर्षांत 2 हजार गुन्हे

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरुद्ध 'जादूटोणाविरोधी कायदा २०१३' लागू होऊन १३ वर्षे उलटली आहेत. या काळात राज्याने भोंदूगिरीविरुद्ध मोठी लढाई लढली असून आतापर्यंत सुमारे २ हजारहून अधिक भोंदूबाबा आणि मांत्रिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या दशकात दरवर्षी सरासरी ७० ते १०० महिलांनी या भोंदूबाबांकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक शोषणाविरुद्ध तक्रारी नोंदवल्या आहेत.



अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) आणि महाराष्ट्र पोलिसांच्या आकडेवारीनुसार, मुंबईसह ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हे नोंदवले गेले आहेत. आजार बरे करणे, गुप्तधनाचा मोह, अपत्यप्राप्ती किंवा कौटुंबिक कलह दूर करण्याच्या नावाखाली महिलांना जाळ्यात ओढले जाते. त्यानंतर 'दैवी शक्ती' किंवा 'कोपा'ची भीती दाखवून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो आणि महाराष्ट्र पोलिसांच्या आकडेवारीनुसार, सुरुवातीच्या काळात या गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते, परंतु जनजागृतीमुळे तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.अंधश्रद्धा केवळ ग्रामीण किंवा अशिक्षित भागात असते असे सहसा मानले जाते. परंतु, शहरातील उच्चशिक्षित लोकदेखील मानसिक ताण, करिअरमधील स्पर्धा आणि कौटुंबिक वादांमुळे 'शॉर्टकट' म्हणून भोंदूबाबांकडे वळत आहेत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील पुसट रेषा ओळखून नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे गरजेचे आहे. कोणत्याही बाबा-बुवांच्या आहारी न जाता कायद्याचा आधार घ्यावा.

महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायदा २०१३ मुळे पीडितांना तक्रार करण्याचे बळ मिळाले आहे. मात्र, पुराव्यांचा अभाव आणि साक्षीदार फितूर होण्यामुळे शिक्षेचे प्रमाण अजूनही आव्हानात्मक आहे. कायद्यात ६ महिने ते ७ वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असली तरी सामाजिक भीतीपोटी आजही अनेक महिला तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची संख्या ही नोंदवलेल्या गुन्ह्यांपेक्षा ३ ते ४ पटीने जास्त असण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रात जादूटोणा कायदा २०१३ रोजी तयार झाल्यानंतर अनेक केसेस उजेडात येत आहेत. मागील १२-१३ वर्षात जवळपास २ हजार गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये महिलांच्या शोषणाच्या गुन्ह्याचे प्रमाण मोठे आहे. अंनिसच्या कार्यकर्त्यांकडे दररोज तक्रारी येत असतात. पण लोक तक्रार दाखल करायला तयार नसतात. या कायद्यात पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. पण काही वेळा पोलिसदेखील तक्रारदार व्हायला तयार नसतात. महाराष्ट्रात नरबळी होतात हे कोणीच मान्य केले नसते, पण या कायद्याने समोर आले. कायदा झाला असला तरी कायद्याचे नियम झालेले नाहीत.

पान १ वरून

# संघटित...

अधिक गुन्हे एकत्रितपणे केले असल्यास हे कलम लावले जाते.

या वाढीव कलमामुळे आरोपींना किमान एक वर्ष तरी जामीन मिळण्याची शक्यता नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अन्यथा, हे कलम लागू नसते तर आरोपी काही दिवसांतच जामिनावर बाहेर आले असते. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आश्वी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. सुदाम शिरसाठ व त्यांच्या पथकाने केली.

या कारवाईमुळे परिसरातील संघटित गुन्हेगारीविरुद्ध पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून, गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# वृंदावन कृषी महाविद्यालय व RCF तर्फे पिंपळगाव देपा येथे भव्य शेतकरी मेळावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गुंजाळवाडी पठार येथील वृंदावन कृषी महाविद्यालय, मोहन ठसे नेत्र रुग्णालय, नारायणगाव आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी २५ मार्च २०२६ रोजी पिंपळगाव देपा येथे भव्य शेतकरी मेळावा आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सकाळी ९:३० वाजता हनुमान मंदिर, पिपळगाव देपा (ता. संगमनेर) येथे संपन्न होणार आहे. शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. राधेश्याम शिवराम गुंजाळ भूषवणार असून, मा. श्री. राहुल गुंजाळ यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. मेळाव्यात प्रामुख्याने 'टोमॅटो पिकावरील सद्यस्थिती व उपाययोजना' तसेच 'जमीन आरोग्य व्यवस्थापन' या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येईल तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वृंदावन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रोहित उंबरकर यांनी केले आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क - ८८८८६४६२६८

# गुंजाळवाडी येथे गुरुवार पासून अखंड हरिनाम सप्ताह

## आ. खताळ आणि पत्नी नीलम खताळ यांची प्रमुख उपस्थिती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी (राहणे मळा) परिसरातील हनुमान मंदिरात गुरुवार दि. २६ मार्च २०२६ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या निमित्त सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहला आमदार अमोल खताळ आणि पत्नी नीलम खताळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सालाबादप्रमाणे याहीवर्षी राहणे मळा येथील अखंड हरिनाम सप्ताह साठी महाराष्ट्रातील नामांकित कीर्तन कार व प्रवचनकार यांची कीर्तने व प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत.त्यात रामायणाचार्य निवृत्ती महाराज रायते समाजप्रबोधनकार जयश्रीताई महाराज तिकांडे, गायना चार्य ज्योतीताई महाराज धनाडे, विनोदाचार्य सागर महाराज दिंडे, शिवचरित्रकार दत्तात्रय महाराज धुमाळ, समाजप्रबोधनकार संदीप महाराज खडांगळे आणि शिवशंभो चरित्रकार अनिल महाराज देवळेकर यांची कीर्तने होणार आहेत. तसेच ईश्वरीताई जाधव, पायलताई चकोर, सृष्टी महाराज कासार, शोभाताई महाराज जगताप, एवायणी अहिरे, सुनीताताई भागवत व बन्सी महाराज गुंजाळ यांची प्रवचने होणार आहेत. तर या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ रोजी भागवताचार्य पोपट महाराज राक्षे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होऊन महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. या धार्मिक सप्ताहासाठी राहणे मळा, कुऱ्हे मळा, अरगडे मळा, लक्ष्मी नगर गुंजाळ मळा जगताप मळा यासह गुंजाळवाडी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राहणे मळा अखंड हरिनाम सप्ताह समितीने केले आहे.

# शिक्षणासोबत आत्मविश्वास महत्त्वाचा - डॉ. गीता शिंदे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: - शिक्षण प्रसारक संस्थेचे मातोश्री ललिता देवी मालपाणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि मातोश्री इंदिराबाई रतिलाल गांधी अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ११ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित या 'प्रेरणादायी' कार्यक्रमातून स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. गीता शिंदे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध व्याख्यात्या सौ. स्मिता गुणे होत्या. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे, सौ. सविता घुले, डॉ. ज्योती मेस्त्री आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ आणि सरस्वती देवी यांच्या प्रतिमा पूजनाने व विद्यापीठ गीताने झाली.

प्रास्ताविकात कु. प्राची पावळ यांनी महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व विषद केले. डॉ. ज्योती मेस्त्री यांनी महिला दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगतानाच स्त्रीशक्तीला संधी मिळाल्यास समाजाचा विकास जलद होतो, असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुण्या डॉ. गीता शिंदे यांनी महिलांच्या सर्वांगीण आरोग्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या,

स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. तिने केवळ इतरांची काळजी न घेता स्वतःचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य जपले पाहिजे. आत्मविश्वास आणि शिक्षण हीच महिलांच्या प्रगतीची खरी शस्त्रे आहेत. अध्यक्षीय भाषणात सौ. स्मिता गुणे यांनी अहिल्यादेवी होळकर ते सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची उदाहरणे देऊन उपस्थित छात्र-शिक्षकांना प्रेरित केले. प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे यांनीही महिलांच्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे बी.एड. व डी.एड. विभागातील विद्यार्थिनींनी सादर केलेली 'शक्तीरूपेण' ही संगीतमय नाटिका. यामध्ये स्त्रीच्या विविध रूपांचे प्रभावी चित्रण करण्यात आले.

# २०२९ च्या निवडणुकीपूर्वी 33 टक्के महिला आरक्षण लागू होईल ?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्र सरकार २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी ३३% आरक्षण लागू करण्याच्या तयारीत आहे. यासाठी संसदेच्या सध्याच्या अधिवेशनात दोन विधेयके आणली जाऊ शकतात.

या विधेयकांमुळे महिला आरक्षण लागू करण्याच्या सध्याच्या अटींमध्ये बदल केला जाईल. यामुळे लोकसभेतील सदस्यांची संख्या वाढून ८१६ होऊ शकते. तर महिला खासदारांसाठी आरक्षित जागांची संख्या २७३ होईल.

यावर सहमती मिळवण्यासाठी गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी एनडीए आणि बिगर-काँग्रेसी विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत बैठक घेतली. सहमती झाल्यास, विधेयके याच आठवड्यात सादर केली जाऊ शकतात.

खरं तर, २०२३ मध्ये महिला आरक्षण कायदा संविधानाच्या १०६ व्या दुरुस्तीच्या रूपात मंजूर झाला होता. यानुसार, महिला आरक्षण नवीन जनगणनेनंतर लागू होणार आहे. आता सरकारचा प्रस्ताव आहे की, नवीन जनगणनेची वाट पाहण्याऐवजी २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावरच परिसीमन (पुनर्रचना) केले जावे. यामुळे प्रक्रिया वेळेवर पूर्ण होऊ शकेल आणि आरक्षण लागू करता येईल.

या बदलासाठी सरकार दोन विधेयके आणेल. एका विधेयकाद्वारे नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा केली जाईल, तर दुसरे विधेयक परिसीमन कायद्यातील बदलांशी संबंधित असेल. हे मंजूर करण्यासाठी संसदेत दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असेल.

# मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथे AUB वर आधुनिक उपचार सुविधा

## डॉ. सागर कोटकर यांचे मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथे पूर्णवेळ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सागर कोटकर यांच्या मार्गदर्शनाखाली असामान्य गर्भाशयातील रक्तस्राव या समस्येवर अत्याधुनिक आणि प्रभावी उपचार उपलब्ध करण्यात आले आहेत.

महिलांमध्ये मासिक पाळीदरम्यान जास्त रक्तस्राव होणे, पाळी दीर्घकाळ चालणे, अनियमित पाळी, दोन पाळ्यांच्या मधे रक्तस्राव होणे किंवा रजोनिवृत्तीनंतर रक्तस्राव होणे ही -णइ ची प्रमुख लक्षणे आहेत. अनेक महिला या समस्येकडे दुर्लक्ष करतात, परंतु वेळेत उपचार न घेतल्यास अशक्तपणा (ॲनिमिया) आणि इतर गंभीर गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. या संदर्भात माहिती देताना डॉ. सागर कोटकर (पूर्णवेळ स्त्रीरोग तज्ज्ञ, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर) म्हणाले की, पाळीमध्ये होणारा जास्त किंवा अनियमित रक्तस्राव हा कधीही सामान्य समजू नये. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास ही समस्या पूर्णपणे नियंत्रणात आणता येते. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही आधुनिक तपासण्या, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि आवश्यक असल्यास अल्प-आक्रमक शस्त्रक्रियेद्वारे रुग्णांना सर्वोत्तम उपचार देत आहोत. असामान्य रक्तस्रावामागील कारणांमध्ये हार्मोन्समधील असंतुलन, फायब्रॉईड, पॉलिप्स, थायरॉईड समस्या, पीसीओडी किंवा संसर्ग यांचा समावेश होतो. यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथे सोनोग्राफी, रक्त तपासणी आणि इतर आवश्यक तपासण्यांची सुविधा उपलब्ध आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथे अनुभवी डॉक्टरांची टीम, आधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णकेंद्री सेवा यामुळे महिलांना सुरक्षित व विश्वासार्ह उपचार मिळत आहेत. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता कोणतीही असामान्य लक्षणे दिसल्यास त्वरित डॉ. सागर कोटकर यांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# संगमनेरच्या डॉ. अनुराधा नवाथे यांना पीएच.डी.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्ञान, सातत्यपूर्ण परिश्रम आणि संशोधनाची आवड यांच्या जोरावर अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथील माहिती तंत्रज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. अनुराधा नरेंद्र नवाथे (डॉ. अनुराधा अविनाश चांगले) यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून ***Computer Science and Engineering*** मध्ये पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे. त्यांच्या या यशामुळे अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयासह संपूर्ण संगमनेर परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.



डॉ. नवाथे यांचा संशोधन विषय Aspect Based Emotion Correlation Mining using Hybrid Deep Learning Models Various Feature Selection Techniques on Social Media Reviews असा असून, त्यांनी आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता मशीन लर्निंग आणि सोशल मीडिया विश्लेषण या क्षेत्रात मोलाचे संशोधन कार्य केले आहे. त्यांच्या संशोधनाचा उपयोग भविष्यात डेटा ॲनालिटिक्स, सेंटिमेंट ॲनालिसिस आणि इंडस्ट्री ॲप्लिकेशन्समध्ये मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो.

संशोधन कालावधीत त्यांनी ३ स्कोपस-इंडेक्स आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये संशोधन लेख प्रकाशित केले असून ३ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन निबंध सादर व प्रकाशित केले आहेत. तसेच ४ प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवून आपल्या संशोधनाची छाप पाडली आहे. त्यांच्या नावावर १ पेटंट आणि १ कॉपीराइट्स नोंदविण्यात आले असून त्यांच्या संशोधन कार्याची गुणवत्ता आणि नावीन्य अधोरेखित होते.

या संशोधन प्रवासात त्यांना अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय, चिखली येथील संगणक विज्ञान व आयटी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अविनाश एस. कापसे यांचे सक्षम मार्गदर्शन लाभले. तसेच संशोधन केंद्र प्रमुख डॉ. व्ही. एम. ठाकरे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. मोहम्मद अतीक, विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. हेमंत आर. देशमुख आणि पीएच.डी. सेल प्रमुख डॉ. नितीन कोळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते तसेच प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

डॉ. अनुराधा नवाथे या माजी आमदार काकासाहेब नवाथे यांच्या नात असून अमरावती येथील उत्कृष्ट क्रिकेटपटू नरेंद्र नवाथे यांची सुपुत्री आहेत. त्या अविनाश चांगले यांच्या पत्नी असून, भाऊ योगेश नवाथे तसेच कुटुंबीयांनी त्यांच्या यशामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मुलगा अमोघ आणि मुलगी सई यांच्यासह संपूर्ण कुटुंबाने दिलेला पाठिंबा त्यांच्या यशामागील प्रेरणादायी शक्ती ठरली आहे.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या विश्वस्त शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर प्रा. धुमाळ सर, अकॅडेमिक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. विजय वाघे, विभागप्रमुख डॉ. बायसा गुंजाळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. अनुराधा नवाथे यांचे अभिनंदन केले आहे.

# पुष्पा माधवसा बिल्लाडे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील नामवंत बिल्लाडे यांच्या कुटुंबातील अनिल आणि सुनिल माधवसा बिल्लाडे यांच्या मातोश्री पुष्पा माधवसा बिल्लाडे यांचे मंगळवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या निधनाने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या प्रेमळ स्वभावाने, साधेपणाने आणि माणुसकीने अनेकांच्या आयुष्यात आनंद पेरला होता. त्यांची उणीव कधीच भरून निघणार नाही अशी भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केली. मंगळवारी दुपारी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. पुष्पा माधवसा बिल्लाडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# अनंत फंदी नाट्यगृह स्थानिकांना सवलतीत मिळावे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रविवार दिनांक २२ मार्च रोजी हौशी प्रायोगिक कलावंत संघाच्या अहिल्यानगर जिल्हा पदाधिकाऱ्यांनी संगमनेर येथे कवी अनंत फंदी नाट्यगृहाच्या नुतनीकरण कामाची पाहणी केली. यावेळेस संघाचे अध्यक्ष संजय लोळगे, उपाध्यक्ष संदीप येळवंडे, कार्यवाह डॉ अमित शिंदे, खजीनदार कल्पना नवले, शुभम घोडके, सिद्धी कुलकर्णी, डॉ. नवनाथ वाबळे यांनी या नाट्यगृहाचे वस्तूविशारद अरविंद वैद्य यांच्याशी सविस्तर चर्चा करून कामाचा आढावा घेतला आणि नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांना स्थानिक कलावंतांच्या मागण्यांसंदर्भात निवेदन दिले. याप्रसंगी माजी विधान परिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी हौशी प्रायोगिक कलावंत संघाच्या सदस्याशी चर्चा करून मार्गदर्शन केले.



मा. आमदार सत्यजित तांबे हे कलावंत संघाचे प्रश्न विधान परिषदेत मांडून, संगमनेर येथे राज्य नाट्य स्पर्धेचे केंद्र व्हावे यासाठी प्रयत्न करतील तसेच ग्रामीण भागातील कलाकारांसाठी राज्य नाट्य स्पर्धेत स्वतंत्र विभाग करण्याची मागणी करतील अशी ग्वाही दिली.

अनंत फंदी नाट्यगृहाचे काम पूर्ण झाल्यानंतर तेथे स्थानिक कलावंतांना प्राधान्य असावे तसेच स्थानिक नाट्य संस्थांना नाट्यप्रयोगासाठी ते सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावे अशी अपेक्षा यावेळेस नाट्य संघाचे अध्यक्ष संजय लोळगे यांनी व्यक्त केली.

# पीडितांच्या आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल केल्यास गुन्हा दाखल होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

अशोक खरात प्रकरणानंतर सोशल मीडियावर पीडित महिलांबाबत आक्षेपार्ह मजकूर, फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सायबर पोलिसांनी थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. पीडित महिलांची बदनामी करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पीडित महिलांसोबत इतर संबंधित महिलांचेही फोटो चुकीच्या पद्धतीने वापरले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे निरपराध महिलांचीही बदनामी होत असल्याने पोलिसांनी अशा प्रकारांना गांभीर्याने घेतले आहे.

या प्रकरणानंतर अनेक फोटो सोशल मीडियावर मॉर्फ करून तसेच -ख तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बनावट स्वरूपात व्हायरल केले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक सायबर पोलिसांनी अशा सर्व आक्षेपार्ह पोस्ट्सवर बारकाईने लक्ष ठेवले असून, संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. कोणत्याही प्रकारे बदनामीकारक मजकूर, फोटो किंवा व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर थेट गुन्हा नोंदवला.

## विशेष संपादकीय...

साधूपणाचा आव आणून पाप करतात. म्हणूनच समाजाने सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. अंधश्रद्धा, अंधभक्ती आणि अज्ञान या गोष्टींमुळेच अशा भोंदू लोकांना बळ मिळते.

**या समस्येवर उपाय काय?**

प्रथम, समाजात जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि विवेकबुद्धी यांचा प्रसार झाला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने कोणत्याही बाबतीत आंधळेपणाने विश्वास न ठेवता प्रश्न विचारण्याची सवय लावली पाहिजे.

दुसरे म्हणजे, अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीला-ती धार्मिक वेशात असो किंवा प्रभावशाली असो-कायद्यापेक्षा मोठे समजता कामा नये. पीडितांना न्याय मिळवून देणे ही राज्ययंत्रणेची जबाबदारी आहे. तिसरे म्हणजे, खरे संत आणि समाजसेवक यांची ओळख समाजाने जपली पाहिजे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांसारख्या संतांनी समाजाला सत्य, नैतिकता आणि भक्तीचा मार्ग दाखवला. त्यांनी कधीही स्वार्थासाठी धर्माचा वापर केला नाही. त्यामुळे खऱ्या आणि खोट्या यातील फरक ओळखणे आवश्यक आहे.

शेवटी, संत तुकाराम महाराजांचा संदेश अत्यंत स्पष्ट आहे-

**तुका म्हणे सांगों किती । जळो तयांसी संगती ।।**

म्हणजेच, अशा ढोंगी आणि भोंदू लोकांच्या संगतीपासून दूर राहा. आजच्या समाजात धर्म आणि अध्यात्म यांचे खरे मूल्य टिकवायचे असेल, तर भोंदूगिरीला ठामपणे विरोध करणे गरजेचे आहे. श्रद्धा ही विवेकाने जोडली गेली, तरच समाज निरोगी आणि सुरक्षित राहील.

# मालपाणी विद्यालयात जागतिक हवामान दिन व शहीद दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- येथील मालपाणी विद्यालयात दिनांक २३ रोजी जागतिक हवामान दिन व शहीद दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच पालक प्रतिनिधी सचिन रहाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल सस्कर यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी हवामान दिनाचे महत्त्व सांगताना हवामानाचा आपल्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम स्पष्ट केला. शेती, पाणी, आरोग्य आणि पर्यावरण यांच्याशी हवामानाचा थेट संबंध असून हवामान बदल ही आजची गंभीर समस्या असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी निधी उत्तम शेलकर, समर्थ संतोष क्षीरसागर, ईश्वरी अंकुश ढोले आणि अनन्या गणेश ताजने या विद्यार्थ्यांनी हवामान दिन तसेच भगतसिंग, सुखदेव व राजगुरू या क्रांतिकारकांवर प्रभावी भाषणे केली.

प्रसंगी शकुंतला खरात यांनी शहीद दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीर जवानांच्या बलिदानाचे स्मरण करून दिले. त्यांच्या त्यागामुळेच आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम व कर्तव्यनिष्ठेचा संदेश दिला. पाचवी 'क' च्या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षण या विषयावर नाटिका तसेच या धरणी आईला या गीतावर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया रवींद्र घोलप व ईशिता धरम विश्वकर्मा यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्वरा तुषार काळोखे हिने केले.

या कार्यक्रमासाठी अमोल सस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला .


## ग्रामपंचायत रांजणगाव देशमुख, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर, बी –१ निविदा

ग्रामपंचायत रांजणगाव देशमुख यांचे मार्फत योग्य त्या नोंदणीकृत व अनुभवी मक्तेदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या बी-१ निविदा मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि. २५/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दि. ०१/०४/२०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत शासकीय सुट्टी वगणून व कर्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच निविदा शक्यतो. दि. ०२/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा नंतर उघडण्यात येतील.

| अ. क्रं. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम | नोंदणीकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे रांजणगाव देशमुख येथे गावांतर्गत गटार बांधकाम करणे. ता. कोपरगाव | १५ वा वित्त आयोग सन - २०२५-२६ | ५९३३६४/- | खुला |

**काम पुर्ण करण्याचा कालावधी ०३ महिने राहिल.**

अटी व शर्ती - १) निविदा या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. २) निविदा अटी व शतीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ३) लिफाफाक्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. ४) सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. रांजणगाव देशमुख,
ता.कोपरगाव, जि. अ.नगर

सरपंच
ग्रा.पं. रांजणगाव देशमुख,
ता.कोपरगाव, जि. अ.नगर



We're HIRING
MARKETING EXECUTIVE



Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


## भोंदू बाबा...

लिंगपिसाट नराधमाचे
'आयोग' च धुतो पाय
'चाटणकर' कंपनीच्या छत्रीखाली
नेमकं दडलंय काय ?

राज्याच्या इतिहासामधले
सर्वाधिक विकृत कांड
कोणी पोसला हा भोंदू बाबा
माजलेला वळू - सांड !

कालपासूनच वाजत होती
सतत धोक्याची घंटी
लाजिरवाण्या पद्धतीने
गेल्या रूपाली आंटी

लिंगपिसाट नराधमाचे
झाकता झाकता पाप
आयोगाच्याच ' चाटण ' गिरीचा
झाला सुपडा साफ!

मर्जी जिंकून मंत्र्यांची तो
सुटला होता खूप सुसाट
नीच, नराधम,हलकट, मांत्रिक
विकृत,भोंदू , लिंगपिसाट

त्या मंत्र्यांची काढा 'देवा '
तुरुंगाकडे त्वरित वरात
सर्प विषारी ज्यांनी पोसला
व्यभिचारी उन्मत्त खरात!

'चोरावर मोर' होऊनही
होते चांगलीच 'प्राप्ती'
कोट्यावधींच्या तडजोडीने
लालसेची होते 'तृप्ती'

घातले होते कुलूप तोंडाला
मारणार नव्हते 'बोंब रे'
माझेही वस्त्रहरण करणाऱ्या
वस्ताद निघाल्या 'ठोंबरे' !

**कवी मुरारी देशपांडे**
**९८५०४२५७४४**

# पंचायत समिती ...

पान १ वरून - त्यानंतर दि. २३ मार्च २०२६ रोजी २:१० वाजण्याच्या दरम्यान शेडगाव येथील महिला, त्यांचे पती व शरद नाना थोरात हे पंचायत समिती कार्यालयात आले. शरद थोरात यांनी विचारणा केली की, शेडगाव येथील सी. आर. पी. महिलेला मानधन का मिळत नाही. त्यावेळी पंचायत समिती अधिकारी कोकाटे यांनी सांगितले की, शेडगाव येथील सी. आर. पी. महिले विषयी तक्रार असुन त्यांची कामगिरी असमाधानकारक असल्याने त्यांना गटविकास अधिकारी यांनी नोटीस बजावली आहे. त्यांनी नोटीसीला कुठलेही उत्तर न दिल्याने त्यांचे मानधन रोखुन धरले आहे मात्र हे कारण न पटल्याने शरद थोरात यांनी त्यांना अनेक प्रश्न विचारात जाब विचारला. त्यातून सुरवातीला या दोघांमध्ये बाचाबाची झाली. संतापलेल्या शरद नाना थोरात यांनी अधिकारी नंदलाल कोकाटे यांना चापट मारली. कोकाटे यांनीही प्रतिकार केल्याने हा वाद आणखी वाढला. त्यावेळी पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी वर्गाने हे भांडणे सोडवले. त्यानंतर पंचायत समिती अधिकारी कोकाटे यांनी वरिष्ठांना घडलेला प्रकार सांगितला. तर दुसरीकडे ही माहिती थोरात यांचा मुलगा, पुतणे व कार्यकर्त्यांना समजली. त्यांनी पंचायत समितीत घुसून कोकाटे यांना लाथाबुक्यानी बेदम मारहाण करण्यात आली. तसेच तुला काय करायचे ते तू कर तुझ्याकडे बघून घेतो. त्यावेळी पंचायत समितीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे भांडणे सोडवले. त्यानंतर नंदलाल कोकाटे यांनी संगमनेर शहर पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद दिली. त्यावरून शरद नाना थोरात, अभिषेक थोरात, ऋषीकेश थोरात, अक्षय भालेराव, शिवामत भोकरे (सर्व रा. संगमनेर) इतर चार ते पाच अनोळखी आशा नऊ ते दहा जणांवर शासकीय कामात अडथळयासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा पुढील तपास शहर पोलीस करत आहे.या घटनेने मात्र अधिकारी वर्गात खळबळ उडाली असून झाल्या प्रकाराचा निषेध केला जात आहे.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर
## ई-निविदा सुचना क्रं. ४३ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता बी- १ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये | बयाना रक्कम | निविदा संचाची फी रुपये | नोदणी वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालवधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोकणगाव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथील तुळजाई माता मंदिर परिसर सुशोभीकरण करणे | १५७०७६० | १६००० | ५९० | वर्ग VI व त्यावरील | 06 महिने (पावसाळ्यासह) |
| २ | मौजे कोकणगाव शिवापूर येथे मेंढवण रोड ते अंधरी फार्म (नागझिरा वस्ती) रस्ता करणे ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर | ३८७३७८६ | ३९००० | ५९० | वर्ग V व त्यावरील | 06 महिने (पावसाळ्यासह) |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक २०/०३/२०२६ ते २७/०३/२०२६ |
| २ | निविदा पुर्व बैठक | :- | निरंक |
| ३ | निविदा उघडणे | :- | दिनांक :- २८/०३/२०२६ कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वा. |
| ४ | Online निविदेची "हार्ड कॉपी" सिलबंद लखोटयात सादर करण्याचा दिनांक. | :- | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात दि. २८/०३/२०२६ रोजी १७.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी |

सविस्तर निविदा सुचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
The Details of works Provided in the websites as below.
१. www.mahapwd.com २. https://mahatenders.gov.in
सदर कामाच्या सर्व किंवा एक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

(सही)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
संगमनेर



## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर,
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

बंगला भाड्याने पाहिजे
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

READ
E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड,
ताजने मला, संगमनेर
9921245753

पाहिजेत
अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- २
टेलिकॉलर (महिला)- ३
हेल्पर - ५
7350628728

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
CorelDRAW
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला , गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

पाहिजेत
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी
नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६




MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# कानिफनाथ महाराज यात्रोत्सवात आ. खताळ यांची भव्य लाडू तुला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील घुलेवाडी येथे कानिफनाथ महाराज यात्रोत्सवाच्या निमित्त शिवसेना युवासेना आणि महायुती कार्यकर्त्यांकडून आमदार अमोल खताळ यांच्या वजनाएवढे लाडू अर्पण करून लाडू तुला करण्यात आली.

घुलेवाडी येथील महायुती कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार खताळ यांना मोठ्या मता धिक्याने विजयी करण्यासाठी कानिफनाथ महाराजांना नवस केला होता. तो नवस पूर्ण झाल्यानंतर कानिफनाथ महाराज यात्रोत्सवाचे औचित्य साधून हा आमदार खताळ यांना वजन काट्यात बसवून त्यांच्या वजनाएवढे लाडू ठेवण्यात आले .या लाडूतुला कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. कानिफनाथ महाराज की जय च्या घोषणांनी वातावरण भक्तिमय झाले होते. कार्यक्रमानंतर हे लाडू उपस्थित भाविकांना प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, शिवसेना शाखाप्रमुख शरद्द पानसरे, सिताराम पानसरे, स्वरूप राऊत, स्वप्निल राऊत, संजय पानसरे, राजश्री वाकचौरे, सारंगधर पानसरे, कैलास काशीद, बाळासाहेब राऊत, सतीश भेंडाळे, ओंकार राऊत, विकास राऊत, शुभम सातपुते, विशाल फटांगरे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते तसेच घुलेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

**जनतेने दिलेल्या अपार प्रेम, विश्वास आणि पाठिंब्यामुळेच मला संगमनेर तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करण्याची अमूल्य संधी मिळाली आहे. ही जबाबदारी माझ्यासाठी केवळ पद नसून, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे एक मोठे कर्तव्य आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास करणे, प्रत्येक घटकापर्यंत प्रगती पोहोचवणे आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच माझे मुख्य ध्येय आहे.**

**घुलेवाडीकरांनी केलेला सन्मान आणि दाखवलेले प्रेम हे माझ्यासाठी प्रेरणादायी असून, यामुळे मला अधिक जोमाने आणि निष्ठेने काम करण्याची ऊर्जा मिळते.**

**आ. अमोल खताळ**

# अभ्यासाच्या ताणातून मुक्ती ! व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने विद्यार्थ्यांसाठी घेतल्या क्रीडा स्पर्धा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : अभ्यासाच्या ताणातून मुक्ती मिळवून विद्यार्थ्यांना उत्साही व ऊर्जावान बनविण्यासाठी व्हिजन कोचिंग इन्स्टिटयूटने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. जीईई व नीट सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे.

व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट, संगमनेर येथे अभ्यासाच्या सातत्यपूर्ण दबावामुळे निर्माण होणारा तणाव कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांनसाठी क्रिकेट, मुलींसाठी बास्केटबॉल, रस्सीखेच आणि बॅडमिंटन या विविध क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास उद्घाटनप्रसंगी व्यक्त करण्यात आला आहे.

या स्पर्धांमध्ये पंच म्हणून सुभाष रागीसर, हळनोर सर. देशमुख सर यांनी उत्तम कामगिरी केली. क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन विद्या विद्यापीठ शिक्षण संस्था अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी डॉ. गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना म्हटले की, अभ्यासाच्या ताणातून मुक्ती मिळवणे आणि पुन्हा उत्साहाने अभ्यासाकडे वळणे यासाठी अशा स्पर्धा निश्चितच मदत करतात.

या उपक्रमाचे नियोजन व्हिजन कोचिंग इन्स्टिटयूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हर्षवर्धन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. राहुलकुमार मिश्रा, प्रा. डॉ. ऐश्वर्या साळवे व सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिपूर्णतेने केले. स्पर्धांचे नियोजन अतिशय सुंदर आणि व्यवस्थित होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मनोरंजनासोबतच आरोग्यदायी व्यायामाची संधी मिळाली.

या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, स्पर्धात्मक वृत्ती आणि मानसिक ताकद वाढण्यास मदत होईल, असे संस्थेच्ये मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ हर्षवर्धन गुंजाळ म्हणाले. जीईई व नीट च्या कठोर अभ्यासक्रमात अशा उपक्रमांचा समावेश करून व्हिजन कोचिंग इन्स्टिटयूट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरवत असल्याचे स्पष्ट झाले.

# दूध भेसळखोरांवर कारवाईचा इशारा - मंत्री नरहरी झिरवळ



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी राज्य शासन अत्यंत गंभीर असून, या गुन्ह्यांच्या मुळाशी जाऊन कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मंत्री नरहरी झिरवळ यांनी विधान परिषदेत दिली. आमदार मनीषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, केवळ गुन्हे दाखल करून न थांबता प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. विशेषतः अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून, नुकतेच १९७ नवीन अन्न निरीक्षक प्रत्यक्ष सेवेत रुजू झाले असल्याची माहिती त्यांनी यावेळी सभागृहाला दिली.

विधान परिषदेत बोलताना आमदार मनीषा कायंदे यांनी राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील (पनीर, मावा इ.) भेसळीच्या वाढत्या प्रकरणांवर तीव्र चिंता व्यक्त केली. विशेषतः आंध्र प्रदेशातील रासायनिक भेसळीमुळे झालेल्या मृत्यूंचा संदर्भ देत, महाराष्ट्रातही अशा भेसळखोरांवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल होणार का? असा रोखठोक प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी प्रशासकीय त्रुटींवर बोट ठेवताना सांगितले की, मागील जुलै महिन्यात पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने नवीन कठोर कायदा आणण्याची घोषणा केली होती, परंतु तो कायदा अद्याप का लागू झाला नाही? तसेच, अन्न व औषध प्रशासन विभागात तब्बल ४५% पदे रिक्त असल्याने पुरेसे अन्न निरीक्षक उपलब्ध नाहीत, अशा परिस्थितीत प्रभावी छापे आणि कारवाई कशी होणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अनेक उत्पादनांच्या एक्सपायरी डेट्स आणि लेबल्समध्ये केल्या जाणाऱ्या फेरफारीवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे सांगत, त्यांनी संपूर्ण व्यवस्थेतील गंभीर दोष सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

आमदार मनीषा कायंदे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवळ यांनी सांगितले की, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ ही एक अतिशय गंभीर बाब असून शासन यावर कडक पावले उचलत आहे. त्यांनी वर्सोवा आणि अंधेरी येथील छाप्यांचा संदर्भ देत मान्य केले की, नामांकित ब्रँड्सच्या पिशव्यांमध्ये भेसळयुक्त दूध भरून विकण्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत १४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून ४ जणांवर तडीपारीची कारवाई प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

मंत्री नरहरी झिरवळ यांनी मान्य केले की, मागील काळात अन्न व औषध प्रशासन विभागात मनुष्यबळाची मोठी कमतरता होती. मात्र, शासनाने यावर तातडीने पावले उचलली असून, नुकतीच १९७ नवीन अन्न निरीक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे. या नवनियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून त्यांना प्रत्यक्ष कामावर पदस्थापना देखील देण्यात आली आहे. विभागाच्या सक्षमीकरणासाठी सध्या असलेल्या १२७१ मंजूर पदांऐवजी २५४४ पदांचा नवा आकृतीबंध अपेक्षित असून, त्यासंदर्भातील प्रस्ताव आणि फाईल सध्या वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. भेसळखोरांवर होणाऱ्या कारवाईबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, शासन केवळ गुन्हे दाखल करण्यापुरते मर्यादित न राहता, या गुन्ह्यांच्या मुळाशी जाऊन कठोर कायदेशीर कारवाई करण्यास कटिबद्ध आहे.

# दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयएची काश्मिरात छापेमारी



श्रीनगर (वृत्तसंस्था)

दिल्लीतील लाल किला स्फोट प्रकरणाच्या तपासात राष्ट्रीय जांच एजेंसी (एनआयए) ने आज, सोमवारी पहाटे काश्मीर खोऱ्यात मोठी कारवाई करत एकूण १२ ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत हंदवाडा, कुपवाडा, कुलगाम, रफियाबाद आणि सोपोर या भागांचा समावेश होता.

हंदवाडा जिल्ह्यातील गुलोरा परिसरात एका मोठ्या व्यावसायिकाच्या घरावर एनआयएच्या पथकाने छापा टाकला. अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी सखोल झडती घेत कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर संशयास्पद साहित्याची तपासणी केली. सूत्रांच्या माहितीनुसार, पथकाने पहाटेच कारवाई सुरू केली होती. यापूर्वीही दिल्लीतील स्फोट प्रकरणाच्या अनुषंगाने एनआयएने काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर छापेमारी केली होती. काजीगुंड, शोपियां आणि पुलवामा या भागांमध्ये संशयितांच्या ठिकाणांची तपासणी करण्यात आली होती. या कारवाईत डॉ. अदील, जासिर बिलाल, मौलवी इरफान, डॉ. मुझम्मिल आणि आमिर रशीद यांच्याशी संबंधित ठिकाणांचा समावेश होता. दिल्लीतील लाल किला मेट्रो स्थानकाजवळ १० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यात एका जिहादी दहशतवाद्याने कारमधून स्वतःला उडवून दिले होते. या घटनेनंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या असून तपास यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# पश्चिम आशियातील युद्ध, कच्चे तेल आणि भारत - सौदी अरेबिया संबंध

## बदलती भू-राजकीय समीकरणे




सन २०२६ मध्ये पश्चिम आशियात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीने जागतिक राजकारण आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम घडवून आणला आहे. अमेरिका व इस्त्रायल यांनी इराणवर केलेल्या लष्करी कारवाईनंतर संपूर्ण पर्शियन आखातातील सुरक्षा परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण झाली आहे. या संघर्षामुळे केवळ प्रादेशिक राजकारणच बदलले नाही, तर जागतिक ऊर्जा बाजारपेठेतही मोठी उलथापालथ झाली आहे. विशेषतः भारतासारख्या तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांसाठी ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील ठरली आहे.

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कच्च्या तेलाचा ग्राहक देश आहे. देशातील एकूण ऊर्जा गरजांपैकी मोठा हिस्सा अजूनही कच्च्या तेलावर अवलंबून आहे. भारताला लागणाऱ्या तेलापैकी जवळपास ८८ टक्के तेल आयात करावे लागते, आणि या आयातीतील मोठा भाग पश्चिम आशियातील देशांकडून येतो. त्यामध्ये सौदी अरेबिया हा भारताचा अत्यंत महत्त्वाचा आणि विश्वासार्ह भागीदार मानला जातो. त्यामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेली कोणतीही अस्थिरता भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर थेट परिणाम करते.

**२०२६ च्या संघर्षाची पार्श्वभूमी**

फेब्रुवारी २०२६ मध्ये अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणमधील महत्त्वाच्या लष्करी आणि अणुस्थळांवर मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केले. या कारवाईनंतर इराणने आपल्या प्रादेशिक मित्रदेशांच्या माध्यमातून गल्फ क्षेत्रातील अनेक देशांवर प्रतिहल्ले सुरू केले. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि इतर गल्फ देशांवर ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ले झाल्याने या प्रदेशातील तेल उत्पादन व वाहतूक व्यवस्था मोठ्या संकटात सापडली.

या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली. काही दिवसांतच तेलाची किंमत प्रति बॅरल १२० डॉलर्सपेक्षा अधिक झाली. जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेल्या या अस्थिरतेचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होऊ लागला. तेलाच्या किमती वाढल्यामुळे महागाई वाढण्याची आणि आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली.

**होर्मुझ सामुद्रधुनी :** ऊर्जा वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग पर्शियन आखातातील होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची ऊर्जा वाहतूक मार्गिका मानली जाते. पश्चिम आशियातील अनेक तेल उत्पादक देशांमधून जगभरात जाणारे मोठ्या प्रमाणातील तेल याच मार्गाने वाहून नेले जाते. भारतासाठी या मार्गाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे.

भारतामध्ये आयात होणाऱ्या कच्च्या तेलापैकी सुमारे ४० ते ५० टक्के तेल होर्मुझ सामुद्रधुनीतून येते. तसेच भारताच्या एलपीजी आयातीपैकी जवळपास ८० ते ९० टक्के वाहतूक याच समुद्री मार्गाने केली जाते. त्यामुळे या मार्गातील कोणताही अडथळा भारतासाठी गंभीर आर्थिक संकट निर्माण करू शकतो.

२०२६ मधील संघर्षाच्या काळात इराणने या समुद्रमार्गात माइन टाकणे, जलदगती हल्लेखोर नौका तैनात करणे आणि जीपीएस सिग्नलमध्ये अडथळे निर्माण करणे यांसारख्या कारवाया केल्यामुळे तेलवाहू जहाजांच्या सुरक्षिततेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले. परिणामी जहाजांच्या विमा खर्चातही मोठी वाढ झाली. युद्धजन्य परिस्थितीमुळे जहाजांच्या विमा प्रीमियममध्ये जवळपास ४०० टक्क्यांची वाढ झाली, ज्यामुळे प्रत्येक बॅरल तेलाच्या किमतीत अतिरिक्त वाढ झाली.

**भारतासाठी सौदी अरेबियाचे धोरणात्मक महत्त्व**

या संकटकाळात सौदी अरेबियाने भारतासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. पारंपरिक अर्थाने पाहता सौदी अरेबिया हा भारताचा प्रमुख तेल पुरवठादार आहे. परंतु २०२६ च्या संघर्षानंतर त्याची भूमिका केवळ व्यापारी भागीदार म्हणून मर्यादित राहिली नाही. उलट, तो भारताच्या आर्थिक स्थैर्यासाठी एक धोरणात्मक स्थिरता प्रदान करणारा भागीदार बनला.

होर्मुझ सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबियाने आपली ईस्ट-वेस्ट पाइपलाइन (पेट्रोलाइन) वापरून तेल वाहतुकीचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला. या पाइपलाइनच्या माध्यमातून पर्शियन आखातातून तेल थेट लाल समुद्रावरील यान्बू बंदरापर्यंत पोहोचवले जाते. तेथून पुढे जहाजांद्वारे भारतासह इतर देशांमध्ये तेल निर्यात केले जाते. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील धोका टाळूनही तेल पुरवठा सुरू ठेवणे शक्य झाले. याशिवाय सौदी अरेबियाच्या अरामको कंपनीने संकटकाळात भारताला प्राधान्य देत तेल पुरवठा कायम ठेवला. भारतातील वडीनार आणि कोची येथील रिफायनरींना सतत तेलपुरवठा मिळत राहिला, ज्यामुळे भारताच्या ऊर्जा पुरवठ्यात मोठी अडचण निर्माण झाली नाही.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची कसोटी**

या युद्धामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाचीही मोठी कसोटी लागली. भारताचे इस्त्रायलसोबत संरक्षण क्षेत्रात घनिष्ठ संबंध आहेत. दुसरीकडे, ऊर्जा सुरक्षेसाठी सौदी अरेबिया आणि इतर गल्फ देश अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या संघर्षाच्या काळात भारताने संतुलित धोरण स्वीकारले. भारताने एका बाजूला इस्त्रायलसोबतचे संरक्षण सहकार्य कायम ठेवले, तर दुसऱ्या बाजूला सौदी अरेबियासोबतचे ऊर्जा आणि आर्थिक संबंधही मजबूत ठेवले. या धोरणाला 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' असे म्हटले जाते. म्हणजेच कोणत्याही एका शक्तीच्या पूर्ण प्रभावाखाली न जाता स्वतःच्या राष्ट्रीय हितांच्या आधारावर परराष्ट्र धोरण राबवणे.

**ऊर्जा सुरक्षेतील मर्यादा**

या संकटाने भारताच्या ऊर्जा सुरक्षेतील काही महत्त्वाच्या मर्यादा देखील उघड केल्या. भारताकडे सध्या असलेले स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह केवळ सुमारे १७ ते १८ दिवसांच्या तेलसाठ्यासाठी पुरेसे आहेत. जर होर्मुझ सामुद्रधुनी दीर्घकाळ बंद राहिली, तर भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

म्हणूनच भारताने ऊर्जा आयातीचे विविधीकरण, पर्यायी वाहतूक मार्गांचा विकास आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे या बाबींवर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**भविष्यातील दिशा**

पश्चिम आशियातील परिस्थिती पाहता भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील संबंध भविष्यात आणखी महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. ऊर्जा सहकार्याबरोबरच पायाभूत सुविधा विकास, गुंतवणूक आणि व्यापार या क्षेत्रांमध्येही दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढत आहे. विशेषतः भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (खचएउ) सारख्या प्रकल्पांमुळे भविष्यात ऊर्जा आणि व्यापारासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होऊ शकतात. या प्रकल्पांच्या माध्यमातून भारत आणि पश्चिम आशियातील देशांमध्ये आर्थिक आणि धोरणात्मक संबंध अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे.

**निष्कर्ष**

एकूणच, २०२६ मधील पश्चिम आशियातील युद्धाने भारत-सौदी अरेबिया संबंधांचे नवे वास्तव स्पष्ट केले आहे. कच्चे तेल हे केवळ व्यापाराची वस्तू नसून ते आजच्या जागतिक राजकारणात अत्यंत महत्त्वाचे भू-राजकीय साधन बनले आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी सौदी अरेबियासोबतचे संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत.

भविष्यात भारताने ऊर्जा सुरक्षेसाठी दीर्घकालीन धोरण तयार करताना पश्चिम आशियातील स्थैर्य, सुरक्षित वाहतूक मार्ग आणि धोरणात्मक भागीदारी यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. कारण जागतिक राजकारणातील बदलत्या परिस्थितीत ऊर्जा सुरक्षाच एखाद्या देशाच्या आर्थिक व राष्ट्रीय सुरक्षिततेचा आधार बनत आहे.

**मधुसूदन राजेश शिंदे**
**संगमनेर, ९८५०११०६५०**

पॅनल
देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल
देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# महिलांना निर्णय स्वातंत्र्य गरजेचे - वर्षाताई देशपांडे

## सत्यशोधक विचार मंचाचा प्रबोधन कार्यक्रम उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : सत्यशोधक विचारमंच आयोजित व्याख्यान पुष्प - ३ रे या व्याख्यानमाले अंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासंदर्भातील महत्त्वपूर्ण व्याख्यान नुकतेच उत्साहात पार पडले. महिला सक्षम असतानाच या विषयावर आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ महिला हक्क कार्यकर्त्या व संयुक्त राष्ट्र संघ पुरस्कार प्राप्त ड. वर्षाताई देशपांडे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

आपल्या अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी भाषणातून देशपांडे यांनी महिलांच्या सक्षमीकरणाची गरज अधोरेखित करत समाजातील विद्यमान परिस्थितीवर भाष्य केले. महिलांनी स्वावलंबी आणि सक्षम होण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध पैलूंवर त्यांनी सखोल विचार मांडले. महिलांच्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन करत त्यांनी सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले.

त्या म्हणाल्या की, एका बाजूला महिलांना देवीचे स्थान देत त्यांची पूजा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून त्यांचा अपमानही केला जातो. महिला या मुळात सक्षमच असतात; मात्र पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करू दिल्या जात नसल्याने त्यांच्या कर्तृत्वाला वाव मिळत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

महिलांच्या राजकीय प्रभावाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, भले दिड हजार रुपयांच्या किमयाने का होईना महिलांनी महाराष्ट्रासह अनेक राज्यांत सत्ताबदल घडवून आणण्याची ताकद दाखवली आहे. महिलांना स्वावलंबी करण्यासाठी त्यांना निर्णयस्वातंत्र्य देणे गरजेचे असून त्या निश्चितच सकारात्मक परिवर्तन घडवून आणतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भविष्यात घर, शेतजमीन महिलांच्या नावे करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

हा कार्यक्रम रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी व्यापारी असोसिएशन हॉल, संगमनेर येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निर्मिती महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा प्रज्ञाताई लामखडे होत्या. प्रास्ताविक राष्ट्र सेवा दलाच्या अनुराधा आहेर यांनी केले.

यावेळी हिरालाल पगडाल, सेवा दलाचे तालुका अध्यक्ष रामू चन्ना, रामचंद्र कमलाकर, सीमाताई मालपाणी, चंद्रकला घुले, सना पठाण, पुष्पा हांडे, वैशाली काकड, सविता पांडे, संगीता हासे, प्रमिला अभंग, पुष्पा सुर्वे, समीर लामखडे, छात्रभारतीचे राज्य अध्यक्ष अनिकेत घुले, सत्यशोधक विचारमंचचे समन्वयक संदीप काकड, के. जी. भालेराव, राम अरगडे, दत्तू थिटमे, अमोल शेलकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला कार्यकर्त्या व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. मिनाक्षी सतीश सहाणे यांना व्यवस्थापन विषयात पीएच. डी.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँण्ड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, संगमनेर येथील सहाय्यक प्राध्यापिका प्रा. मिनाक्षी सतीश सहाणे यांनी व्यवस्थापन *(Management)* विषयात पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे. त्यांनी सनराईज विद्यापीठ, अलवर (राजस्थान) या यूजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला असून त्यांच्या या यशामुळे अमृतवाहिनी संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.



प्रा. सहाणे यांचा संशोधन विषय Pressurized Work Organization - Its Impact on Social Welfare असा असून त्यांनी कार्यसंस्कृती, तणावग्रस्त कामकाज प्रणाली आणि त्याचा सामाजिक परिणाम या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सखोल आणि अभ्यासपूर्ण संशोधन केले आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण कार्यपरिस्थितीत हा विषय अत्यंत उपयुक्त ठरणारा असून उद्योग, संस्था आणि समाज व्यवस्थेसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.

प्रा. मिनाक्षी सहाणे यांना डॉ. नीलू लांबा यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले.

शैक्षणिक क्षेत्रात १४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या प्रा. सहाणे यांनी एम.ए., बी.एड., एम.एड. तसेच एचआरएममध्ये एमबीए अशी उच्च शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे. त्यांनी आतापर्यंत ८ संशोधन लेख प्रकाशित केले असून ३ राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे अध्यापनासोबत संशोधन क्षेत्रातही त्यांनी भक्कम स्थान निर्माण केले आहे.


या उल्लेखनीय यशाबद्दल अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या विश्वस्त शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर प्रा. धुमाळ सर, अकॅडेमिक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, एमबीए महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. बी. एम. लोंढे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

प्रा. मिनाक्षी सहाणे यांच्या या यशामध्ये पती सतीश सहाणे, मुले श्रेयस आणि मयुरेश, तसेच सहाणे परिवार व रेवगडे परिवार यांची मोलाची साथ लाभली. त्यांच्या पाठिंब्यामुळेच त्यांनी हे यश संपादन केले असल्याची भावना व्यक्त होत आहे.

प्रा. मिनाक्षी सहाणे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार व सहकारी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# महाराष्ट्र शासनाने हर्षवर्धन सदगीरला सरकारी नोकरीत घ्यावे ; आ. सत्यजीत तांबे





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आज सभागृहात पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून आमदार सत्यजीत तांबे यांनी डबल महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर च्या विषयावर सरकारचे लक्ष वेधले. सदगीर याने दोन वेळा महाराष्ट्र केसरी किताब पटकावत राज्याचा गौरव वाढवला असून त्याचे आ. तांबेंनी सभागृहात अभिनंदन देखील केले.

यावेळी बोलताना तांबे म्हणाले की, सध्या महाराष्ट्र केसरीच्या स्पर्धांचे स्वरूप बदलत असून एकाच वेळी दोन-दोन स्पर्धा घेतल्या जात आहेत. यामुळे कुस्तीला वेगळी दिशा मिळत असली तरी शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच मागील महाराष्ट्र केसरी स्पर्धेनंतर हर्षवर्धन सदगीरला सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, तो आता 'डबल महाराष्ट्र केसरी' झाल्यानंतरही अद्याप त्याला नोकरी मिळालेली नाही ही बाब अत्यंत चुकीची आहे.

खेळाडूंचे मनोबल उंचावण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेऊन सदगीरला सरकारी नोकरीत सामावून घ्यावे. अशी ठाम मागणी तांबेंनी केली. तसेच या संदर्भात सरकारने सभागृहात स्पष्ट निवेदन करावे अशीही मागणी केली.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25